कि.फौ.अर्ज. क्र.०५/२०२४
किरण वि. अमोल
**नि.क्र. ४२**

**<u>गैरअर्जदार क्र. १ चा अधीकचा सरतपास श्री. ए. आर. ईटनकर वकील साहेब यांच्यातर्फे शपथेवर सुरुः-</u>**

१. मी माझा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.४२** वर दाखल केले आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला मराठीत समजवून सांगितला आहे तो बरोबर आहे.

२. अदखलपात्र गुन्हाच्या संबंधातील गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवालाची प्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यास **नि.क्र. ४५** देण्यात येते. मी अभिलेखावर किरण हिला दवाखान्यात घेऊन गेल्याबाबत पार्थ क्लिनिक दोन दस्त दाखल केले आहे. त्या **आर्टिकल अ** आणि **ब** देण्यात येते. मी अभिलेखावर परमात्मा एक बहुउद्देशिय शिक्षण संस्था, नागपूर यांनी दिलेल्या पत्राची मुळ प्रत दाखल केली आहे त्यास **आर्टिकल क** देण्यात येते. एन. सी. आर. क्र. २७६/२०२४ ची मुळ प्रत दाखल केली आहे त्यास **नि.क्र. ४६** देण्यात येते. किरणला दिलेल्या नोटीसचे उत्तर अभिलेखावर दाखल आहे. त्यास **नि.क्र. ४७** देण्यात येते. दोन रजिस्टर्ड पोस्ट पावती अभिलेखावर दाखल आहे. त्यास **नि.क्र. ४८ व ४९** देण्यात येते. दोन पोच पावती अभिलेखावर दाखल आहे. त्यास **नि.क्र. ५० व ५१** देण्यात येते. किरण हिला दवाखान्यात घेऊन गेल्याबाबत पार्थ क्लिनिकचा दस्त अभिलेखावर दाखल आहे. त्यास **आर्टिकल ड** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**<u>अर्जदार तर्फे उलटतपास श्री. एम. डी. पालीवाल वकील साहेब यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>**

३. ललिता वाडीभस्मे माझी आई व अनुराग माझा भाऊ आहे. सुनिता बोंद्रे

माझी मावशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही संयुक्त कुटुंबात राहतो. हे म्हणणे खरे आहे की, सुनिता बोंद्रे पुर्वी माझ्या घरी येत होती.

**४.** हे म्हणणे खरे आहे की, किरण सोबत माझे लग्न तकीया मारोती देवस्थान, पारशिवनी येथे झाले. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाकरिता देवस्थानाचे हॉल किरणच्या वडिलांनी आरक्षित केला होता. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाचा खर्च किरणच्या वडिलांनी केला होता. हे म्हणणे खरे आहे की, लग्नामाध्ये मला १२ ग्राम वजनाची १ सोन्याची चेन, व ५ ग्राम वजनाची अंगठी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, किरण हिला सोन्याची नथ दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारास चांदीची पायपट्टी दिली होती. नि.क्र. १९ दोन पान माझ्या लग्नात मिळालेल्या आंदणाची आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नात मिळालेल्या भेटवस्तु माझ्या घरी पालोरा येथे ठेवलेल्या आहेत.

**५.** माझ्या पुराव्याचे शपथपत्र मराठी भाषेत आहे. मला इंग्रजी भाषा येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, इंग्रजी भाषेतील माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील मजकूर मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला या विवाहासंबंधातून एक मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी किरणकडे राहते व किरण तिचे पालनपोषण करते. हे म्हणणे खरे नाही की, किरण नांदायला आली तेव्हा तिला काही दिवस चांगले नांदवले व नंतर तिच्यावर घरघुती हिंसाचार केले. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या कुंटुंबातील सर्व लोक किरणवर संशय घेत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न दुसऱ्या मुलीशी लावून देऊ असे वारंवार माझे आई वडील म्हणत होते. हे म्हणणे खरे नाही की, किरण हिला तिच्या वडिलांकडुन पैसे आणण्याकरिता तिच्यावर दबाव आणित होते. हे म्हणणे खरे नाही की, किरणच्या तोंडावर उशी ठेवून तिला मारण्याचा प्रयत्न केला. हे म्हणणे खरे नाही की, किरणवर नेहमी घरघूती हिंसाचार करीत होतो. हे म्हणणे खरे नाही की, किरण हिच्या वडिलांनी लग्नामध्ये एक

गाय भेट दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, गायीची परिस्थिती दयनीय केल्याकारणाने किरणच्या वडिलांनी ती गाय परत मागितली. हे म्हणणे खरे नाही की, गाय संबंधी मी पोलीस स्टेशनला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी गाय परत करण्यास मला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, गाय परत केली नाही व आज रोजी गाय माझ्याजवळ आहे.

६. हे म्हणणे खरे आहे की, दि. २४/०५/२०२३ रोजी किरण हिने माझ्या व माझ्या आई वडिलांविरुद्ध पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यासंबंधात पोलीस स्टेशन येथे चौकशी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की सदर घटना झाल्यानंतर किरणला मी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, मी किरण व तिच्या मुलीला घरातुन बाहेर काढले. हे म्हणणे खरे नाही की, किरणने विनंती करुन सुद्धा परत घरी येऊ दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नाईलाजास्तव किरणचे वडील व आई किरणाला घरी घेऊन गेले. किरण रिपोर्ट दिल्यापासून आईवडिलांकडे पारशिवनी येथे राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, किरणच्या वडिलांनी बरेचदा नातेवाईकांची बैठक बोलाविली होती.

७. हे म्हणणे खरे आहे की, मी किरण विरुद्ध सोडचिट्ठी मिळण्याकरिता केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी केस सोडचिट्ठीच्या केसपूर्वी नांदवायची केस दाखल केली नाही. किरणने नांदावयास यावे याकरिता नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे आहे की, अंतरिम आदेश होण्यापूर्वी मी किरणला कुठलीही आर्थिक मदत केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पालोरा येथे माझ्या वडिलांच्या नावे शेत सर्वे नं. ३५९ ही मालमत्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या शेतीमध्ये मी पोल्ट्री फार्म लावला. हे म्हणणे खरे नाही की, पोल्ट्री फार्म लावला नाही हे खोटे सांगत आहे. मी राहता असलेले घर कुटुंबाचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणूनबूजून किरणला सोबत ठेवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेती व पोल्ट्री फार्ममधून दरमहा मला रु.

४०,०००/– चे उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, मला रु. ६,०००/– दरमहा उत्पन्न मिळते हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी किरण हिला न्यायालयाच्या आदेशानुसार नियमित पोटगीची रक्कम देत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजपर्यंत मी किरण हिला रु. १४,०००/– पोटगीची रक्कम दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी किरण हिचे पालनपोषण करण्याकरिता टाळाटाळ करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अभिलेखावर दाखल केलेले दस्त हे खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी मौदा या गावात कधीही राहलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, मौदा या गावात मी किरण सोबत वैवाहिक जिवन जगलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेल्या नोटीसचा उत्तरातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या बेकायदेशीर कृत्यामुळे किरण तिच्या माहेरी राहते. माझ्या मुलीचे वय तीन वर्ष आहे. माझ्या मुलीला शाळेत प्रवेश घ्यायचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, किरण व माझ्या मुलीला जीवन जगण्याकरिता पैशाची आवश्यकता असते. हे म्हणणे खरे नाही की, त्याकरिता किरण व तिच्या मुलीला प्रत्येकी प्रतिमहा रु. १०,०००/– खर्च येतो. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सांगितलेला मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जबाबातील तसेच मालमत्ता आणि दायित्व दस्तामधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सोडचिठ्ठीची प्रकरण आज रोजी न्यायप्रविष्ठ आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.05.07 17:14:51 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

समक्ष

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.05.07 17:14:55 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः ०७/०५/२०२६